INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

भंडारा जिल्ह्यातील गोसावी जमातींचा स्थलांतर आणि चळवळींचा अभ्यास

स्नेहा भागवत बोरकर — मार्गदर्शक

संशोधन अधिछात्रा — डॉ अजयकुमार शंकरलाल मोहबन्शी

रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर

सारांश :-

हा अभ्यास महाराष्ट्र राज्य भंडारा जिल्ह्यात राहणाऱ्या गोसावी जमातींचा स्थलांतर आणि सामाजिक चळवळींच्या शोध घेतो. गोसावी ही भारतातील एक पारंपारिक भटक्या अर्ध- भटक्या स्वरूपाची जमात आहे. ऐतिहासिक दृष्ट्या धार्मिक परंपरा, भिक्षाटन तसेच लहान - मोठे व्यवसाय यांवर त्याचा उदरनिर्वाह चालत असे. सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय कारणामुळे या जमातीला सतत स्थलांतर करावे लागले. स्थलांतरामुळे शिक्षण, आरोग्य, रोजगार व सामाजिक ओळख यासारख्या अनेक समस्या निर्माण झाल्या या समस्यांच्या पार्श्वभूमीवर गोसावी समाजात विविध सामाजिक चळवळी उद्यास आल्या. या चळवळींच्या माध्यमातून शिक्षण, सामाजिक हक्क, ओळख आणि विकासासाठी प्रयत्न करण्यात आले. या संशोधनात प्राथमिक आणि दुय्यम डेटा विश्लेषणासाठी वापरला गेला आहे. गोसावी जमातीच्या १०० प्रतिसादकांचे नमुना काढला आहे. या संशोधनात गोसावी जमातीच्या स्थलांतराच्या कारणांचा तसेच त्यांच्या सामाजिक चळवळींचा अभ्यास करण्यात आला आहे.

मूळ शब्द :- गोसावी जमात, स्थलांतर, भटक्या विमुक्त जमाती, सामाजिक चळवळी, सामाजिक परिवर्तन.

प्रस्तावना :-

भारत हा विविध संस्कृती, भाषा आणि सामाजिक गटांनी समृद्ध असा देश आहे. या विविधतेत भटक्या विमुक्त जमातींचे विशेष स्थान आहे. गोसावी जमातीमध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक स्थिती मध्ये सुधारणा झालेली दिसून येत आहे. महाराष्ट्रात अशा अनेक भटक्या जमाती आढळतात. त्यापैकी गोसावी किंवा नाथपंथी दवरी गोसावी ही एक महत्त्वाची जमात आहे. स्थलांतराला सक्षम आणि प्रोत्साहन देणारे

सामाजिक नेटवर्क आणि भांडवल हे जाती आधारित नेटवर्क आहेत. त्यामुळे काही स्थलांतर प्रवाह स्थलांतरित साठी सहजपणे उपलब्ध असू शकतात. तर काही प्रवाह पूर्णपणे बंद होतील या संशोधनात वेगळ्या स्थलांतर परिणामावर लक्ष केंद्रित करतो. सामाजिक चळवळीवर करून परिणाम दिसू लागले. या जमातीचे जीवन पारंपारिक रित्या भटके स्वरूपाचे असून त्याचे स्थलांतर , धार्मिक परंपरा आणि सामाजिक जीवन हे समाजशास्त्र अभ्यासासाठी महत्त्वाचे आहे.

गोसावी जमाती ही ऐतिहासिक दृष्ट्या धार्मिक परंपरेची संबंधित आहे. या समाजातील लोक देवतांचे भजने, कथाकथन, गोंधळ, लोककला आणि धार्मिक कार्यक्रम याद्वारे उपजीविका करत असत. त्यांचे जीवन स्थिर नसून ते विविध गावांमध्ये मध्ये फिरत राहायचे त्यामुळे त्यांना भटक्या जमातींच्या वर्गात समाविष्ट करण्यात आले आहे. दुसरीकडे, स्थलांतर हे आधुनिकीकरण आणि शहरीकरणाशी संबंधित होते. स्थलांतरावरील पूर्वीच्या अभ्यासात ते या प्रक्रियांचा अपरिहार्य परिणाम म्हणून परिणाम म्हणून पाहिले जाते. ते आधुनिक नागरिकांच्या निर्मितीचे केंद्र म्हणून पाहिले जाते. शिवाय, बहुतेक संशोधनांचा भर ग्रामीण शहरी स्थलांतरावर आहे ज्याप्रमाणे स्थलांतरित व्यक्ती शहरी वातावरणाचा भाग बनण्यासाठी ग्रामीण भागात सोडून जाताना दिसते.

गोसावी जमातींचा इतिहास 500 वर्षापेक्षा जुना असल्याचे मानले जाते. या समुदायाचे लोक कालभैरवनाथ या देवतेचे उपासक आहेत. इतिहासात या जमातीच्या लोकांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातही काही सामाजिक व सांस्कृतिक भूमिका बदलण्याचा उल्लेख आढळतो. काही संशोधकांच्या मते, या समाजातील लोकांनी भजन, कथा, गोंधळ, याद्वारे लोक जागृती करण्याचे काम केले. ब्रिटिश काळात भारतातील अनेक भटक्या जमातींना Nomadic tribes या वर्गात समाविष्ट करण्यात आले. गोसावी जमातही याच गटात मोडते. या काळात त्यांचे जीवन पूर्णपणें भटक्या स्वरूपाची होते. आणि त्यांच्याकडे स्थिर जमीन किंवा निवासस्थान नव्हते. स्थलांतर हे गोसावी समाजाच्या जीवनाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. रोजगार, धार्मिक परंपरा, नैसर्गिक परिस्थिती आणि सामाजिक बहिष्कार यामुळे या जमातीला एका विशिष्ट एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करावा लागते. या परिस्थितीत त्यांच्या सामाजिक हक्कासाठी व विकासासाठी विविध सामाजिक चळवळी उद्यास आल्या. त्यामुळे गोसावी जमिनीची स्थलांतर व सामाजिक चळवळी यांच्या अभ्यास करणे आवश्यक आहे.

भटक्या जमाती म्हणजे त्या लोकसमुहांची ज्यांच्या पारंपारिक व्यवसाय किंवा जीवनशैली भटकते किंवा स्थलांतरित होण्याची संबंधित आहे या जमातीची जीवनशैली परंपरा आणि संस्कृती त्यांच्या मोठा भाग त्यांच्या इतिहास प्राचीन काळापासून सुरू होते. वर्तमान काळात भटक्या विमुक्त जमातींच्या सामाजिक स्थितीचे वेगाने बदलत आहे. या जमातींच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीला भोगाव्या लागलेल्या समस्यांच्या आणि त्यांच्या जीवनात आलेल्या बदलांच्या गोडवा आहे. मागील काही दशकामध्ये या जमातींच्या विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून हक्क मिळाले असले तरी त्यांच्या समाजात समावेश आणि मानवी अधिकारांचे पूर्तत अजूनही एक मोठा प्रश्नचिन्ह आहे. भटक्या विमुक्त जमातींच्या जीवनात परिवर्तनाचे मुख्य कारण म्हणजे आधुनिक, शहरीकरण, शिक्षण रोजगाराच्या संधी, तसेच सरकारी योजनांच्या विस्तार अनेक भटक्या जमातीच्या मुलांनी शिक्षण घेऊन आपले जीवन सुधारले आहेत. त्यांच्यावर असलेल्या भेदभावांच्या मानसिकतेमुळे, त्यांना संधीच्या अभाव, आणि पिढ्यानपिढ्या चालणारी गरिबी हि समस्या अजूनही टिकून आहे. सामाजिक स्थितीचे बदल परिक्षेत्र लक्षात घेतल्या या जमातीच्या जीवनात विविधता आहे. काही जमाती समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट होण्यासाठी धडपडत आहेत. तर काही अजूनही पारंपारिक भटकंतीच्या जीवनशैलीत जपत आहेत. अशा स्थितीत भटक्या विमुक्त जमातींच्या समस्या त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने काही महत्त्वाचे मुद्दे समोर येतात. शिक्षणाची वाढती गरज, सामाजिक समतेचा हक्क, रोजगाराच्या अधिक संधी आणि त्यांच्याशी संबंध असलेल्या इतर सामाजिक समस्यांवर उपाय शोधण्याची आवश्यकता आहे. या बदलती सामाजिक स्थितीवर सखोल विचार करणे आणि त्यासाठी योजनांची आखणी करणे अत्यंत महत्त्वाची आहे. कारण त्यामुळे भटक्या मी मुक्ता जमातींच्या जीवनशैलीला एक नवी दिशा मिळू शकते.

संशोधनाची उद्दिष्टे :-

1. भंडारा जिल्ह्यातील गोसावी जमातींच्या स्थलांतराची कारणे समजून घेणे.
2. भंडारा जिल्ह्यातील गोसावी समाजाचा स्थलांतरामुळे समाजावर होणारे सामाजिक परिणाम अभ्यासणे.
3. भंडारा जिल्ह्यातील गोसावी जमातीतील सामाजिक चळवळीचा अभ्यास करणे.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनात प्रस्थापित ज्ञान भर टाकणे किंवा अज्ञान शोध घेण्याच्या प्रयत्न करणे. त्याचप्रमाणे जुन्या तत्वांचे परीक्षण करून नव्याने मांडणी करणे. हा संशोधनाचा हेतू असतो. यासाठी विविध पद्धती आहेत. प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीच्या वापर केला आहे. या अभ्यासासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धती वापरली आहे.गोसावी जमातीचे स्थलांतर कसे होते. त्यामागील कारणे काय आहेत. याचे वर्णन केले जाते. तसेच सामाजिक चळवळींचा त्यांच्या जीवनावर झालेला परिणाम विश्लेषित केला जातो. भंडारा जिल्ह्यातील पिंपळगाव हे क्षेत्र निवडले गेले. गोसावी जमाती निवडण्यात आले. 100 प्रतिसाद कर्त्यांना नमुना काढण्यात आला. मुलाखतीचे वेळापत्रक तयार करून गोसावी जमातीची मुलाखत घेण्यात आली. आंतर विचारादरम्यान संरचित प्रश्नावली आधारे उत्तरदात्यांना काही प्रश्न विचारण्यात आले गोसावी जमातींचा सांस्कृतिक परंपरा, धर्म, वय आणि कुटुंब व्यवस्थेचा अभ्यास केला.

या अभ्यासासाठी भंडारा जिल्ह्यातील गोसावी जमातीतील १०० स्थलांतरित व्यक्तींची निवड करण्यात आली. त्यांच्याकडून प्रश्नावली द्वारे माहिती गोळा करण्यात आली. मुलाखत घेतल्यावर उत्तरदात्यामध्ये ६०% पुरुष आणि ४०% महिला आहेत. त्यामुळे असे दिसून आले की पुरुषांचा सहभाग अधिक आहे. बहुसंख्य उत्तर दाते २९ ते ४५ वयोगटातील ४०% आहे. त्यामुळे या वयोगटातील लोक स्थलांतर प्रक्रियेत अधिक प्रमाणात दिसून आले. मुलाखत घेतल्यावर असे दिसून आले की, ५०% लोक रोजगारासाठी स्थलांतर करतात. आर्थिक अडचणी हे दुसरे महत्त्वाचे कारण आहे. गोसावी जमातींचे लोक ६५% टक्के सामाजिक चळवळीमध्ये सहभागी नाहीत, तर ३५% टक्के लोक काही प्रमाणात सामाजिक चळवळीमध्ये सहभागी आहेत. 55% उत्तरदात्यांच्या मते सामाजिक चळवळींचा सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत.

वरील विश्लेषणावरून असे दिसून आले की, भंडारा जिल्ह्यातील गोसावी जमातीमध्ये स्थलांतराचे प्रमुख कारण रोजगार आणि आर्थिक अडचणी आहेत. सामाजिक चळवळींमध्ये सहभाग तुलनेने कमी असला तरी काही प्रमाणात त्यांचा सकारात्मक परिणाम दिसून येतो.

चर्चा :-

रोजगाराच्या अभावामुळे गोसावी जमातीतील लोकांना विविध भागात जाऊन काम शोधावे लागते. त्यामुळे स्थलांतर वाढते. समाजातील भेदभाव व सामाजिक बहिष्कारमुळे गोसावी समाजाला स्थिर जीवन जगणे कठीण होते. गोसावी जमातीतील अनेक लोक धार्मिक कार्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी जातात त्यामुळे त्यांचे स्थलांतर होते. स्थलांतरामुळे मुलांचे शिक्षण खंडित होते आणि त्यामुळे समाजाच्या विकासात अडथळे निर्माण होतात. गोसावी समाजात शिक्षण, सामाजिक हक्क, आरक्षण ओळख आणि विकास यासाठी विविध सामाजिक चळवळी निर्माण झाल्या. या चळवळींच्या माध्यमातून समाजातील लोकांना संघटित केले जात आहे. आणि त्यांच्या समस्यांकडे शासनाने लक्ष वेधले जात आहे. काही स्वयंसेवी संस्था भटक्या जमातीसाठी सामाजिक जागृती कार्यक्रम राबवतात. अलीकडील काळात गोसावी समाजातील काही नेते राजकीय क्षेत्रातही सक्रिय झाली आहेत. त्यामुळे समाजाच्या समस्या शासनापर्यंत पोहोचण्यास मदत होते.

गोसावी जमाती महाराष्ट्रातील महत्त्वाची भटक्या जमात आहे. त्यांच्या स्थलांतरामुळे त्यांना अनेक सामाजिक आणि आर्थिक समस्यांच्या सामना करावा लागतो. शिक्षणाचा अभाव, रोजगाराच्या कमी संधी आणि सामाजिक भेदभाव या समस्या त्यांच्या विकासाला अडथळा ठरतात. सामाजिक चळवळील आणि स्वयंसेवी संस्था या समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. शिक्षण आरोग्य आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यास या समाजात विकास होऊ शकतो. गोसावी जमातीचे लोक गावोगाव जाऊन धार्मिक कार्यक्रम, भजने आणि कथा सांगून उपजीविका करतात. स्थिर रोजगार नसल्यामुळे त्यांना विविध ठिकाणी जाऊन काम शोधावे लागते. अलीकडील काळात शिक्षण आणि नोकरीच्या शोधात काही कुटुंबे शहरांमध्ये स्थलांतर करत आहेत. भटक्या जमातींना अनेकदा सामाजिक बहिष्काराचा सामना करावा लागतो. गोसावी समाजातील लोक अनेकदा तात्पुरत्या झोपड्यांमध्ये किंवा पालांमध्ये राहतात. ते काही दिवस एका ठिकाणी राहतात आणि नंतर दुसऱ्या ठिकाणी जातात. पूर्वी त्यांचे स्थलांतर मुख्यतः ग्रामीण भागात होते.

अब्राहम आणि सुब्रमण्य (१९७४) दक्षिण भारतातील पाच गावांमधील सर्व जमातीमध्ये सामाजिक गतिशीलता आणि स्थलांतराचे नमुने पाहतात. त्यांनी असे नमूद केले आहे. की भूमिहीन लोकांसह सर्व जातींचे लोक चांगल्या संधी मिळाल्यास बाहेर पडल्यास तयार असतात. या शिवाय आणि जातीमध्ये स्थलांतरात वाढ होण्याची शक्यता आहे. गुप्ता आणि इतर (२००५) बांधकामात कामगार म्हणून भिल्ल जमातीच्या हंगामी स्थलांतराकडे

पाहतात. शहरांमध्ये उद्योगाचे प्रमाण जास्त असल्यामुळे शहरांकडे स्थलांतरण करतात. विजय

(२००५) .यांनी आंध्र प्रदेशातील क्रोधुर या औद्योगिक शहरात कामगार स्थलांतराची गतीशीलता नोंदवली आहे. या अभ्यासात असे नमूद केले आहे की, स्थलांतर आणि सामाजिक चळवळीमुळे गोसावी समाजात सरकारी योजनांचा लाभ मिळतो आहे. दे हान (२००७) यांनी नमूद केले आहे की स्थलांतर हा सर्वांसाठी उपलब्ध पर्याय नाही, तो अत्यंत विभागलेला आहे. आणि सामाजिक विभागणीत बळकटी देतो. स्थलांतर वर्ग आणि क्षेत्र रेषांवर विभागले गेले आहे. फुलर आणि नरसिंहन (२००८) यांनी तामिळ ब्राह्मणामधील शहरीकरण आणि स्थलांतराचा वांशिक अभ्यास केला आहे. त्यांनी नोंदवले आहे की तामिळ ब्राह्मण हा एक शहरीकरण झालेला समुदाय आहे. म्हणजे शहरी भागात तसेच प्रदेशात स्थलांतराचे प्रमाण जास्त आहे. कदम एन डी (१९९२) या शोधनिबंधात महाराष्ट्रातील भटक्या जमाती आणि विमुक्त जातीच्या समस्या दारिद्र्य, स्थलांतर यांचा अभ्यास केला. नारायण भोसले (२०२१) प्रस्तुत लेखात भटक्या विमुक्तांच्या चळवळींचा आढावा घेतला आहे. साधारणतः१९७० च्या दशकात पश्चिम भारतात भटक्या विमातांच्या चळवळी सुरू झालेल्या दिसतात. या पार्श्वभूमीवर दलित व्यथंरची चळवळ, स्त्रियांची चळवळ, समान काम समान दामाची चळवळ, वर्गजाती प्रभुत्व विरोधीच्या चळवळीने बाळसे धरायला सुरुवात केली होती.

बाळकृष्ण रेनके (१९५३) साली मागासवर्गीय यांच्या अभ्यासासाठी ठोमलेल्या काकासाहेब कालेलकर आयोगाचा अहवाल १९५५ साली लोकसभेपुढे ठेवण्यात आला. या आयोगाने आपल्या अहवालात अनुसूचित जाती–जमाती व्यतिरिक्त इतर मागासवर्गीय यांची यादी घेऊन त्यांना सवलती त्यांना शिफारसी केली होती. शिवाय या यादीतील काही जमाती अत्यंत मागासलेल्या असून त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे असे प्रतिपादन केले होते. "प्राचीनतम काळात जेव्हा मानवी संस्कृतीचा उदय होत होता. तेव्हा कमीत कमी भारतात ही मनुष्य जाती तीन प्रमुख संप्रदायामध्ये विभागलेली होती. आणि त्यांचे आचार – विचार आणि संस्कृती परस्परावून भिन्न होती तिसरा समुदाय हा मानववंशाच्या लोकांचीच एक शाखा होय. कोणत्या एक फार पूर्वकाळी मध्यप्रदेशातील मूळ मानव जाती पासून फुटून निघून उत्तर पश्चिमेकडील पर्वत्मय प्रदेशाकडे ही शाखा निघून गेली. हा समुदाय आणि

विज्ञान या दोन्हीमध्ये अविकसित राहिला. पशुपालन हे त्यांचे प्रमुख कारण होते हा समुदाय घुमक्कड भटक्याच राहिला.

लक्ष्मण माने–समाजातील खालच्या वर्गात समजल्या जाणाऱ्या एका जमातीतील भिषण स्थितीचे दर्शन होते. ही जमात म्हणजे कैकाडी जमात होय. या लोकांचे जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या अनेक जुन्या प्रथा, परंपरा, रुढी, प्रापंचिक समस्या, विवाह पद्धती, बळी पद्धती इत्यादी पुस्तकातून आपल्याला समजून न घेण्यात घेतल्याने त्या समाजाच्या परिघावर भटकत राहिला असाव्यात. "अवचट यांनी भटक्या जमातींच्या भटक्या विषयी विविध भूमिका घेतलेल्या दिसतात. मात्र निश्चित अशा कोणत्यातरी भूमिकेवर ते ठाम नाहीत. एके ठिकाणी ते म्हणतात की, आदिम किंवा मेंढपाळ लोकांनी बदलल्या पस्थितीनुसार बदलायचे नाकारले असावे त्यामुळे मागास राहिले असावे किंवा त्या आदीम लोकांना तशाच मागासलेल्या स्थितीत ठेवून मुख्य समाजाने त्यांच्यावर धाक दाखवला असावा. किंवा या जमाती इथल्या मूळ रहिवासी असून मागाहून आलेल्या लोकांनी त्यांना भटके बनवले. या जमाती दुसरीकडून आल्यामुळे इथल्या मूळ समाजाला त्यांना आपल्यात सामावून घेतल्या नसल्यामुळे या जमाती भटकत राहिल्या असाव्यात.

भटक्या विमुक्त जमातींच्या समुदायात शिक्षण आणि रोजगारांच्या संधी कमी आहेत. त्याचे पारंपारिक जीवनशैली आणि स्थलांतरण भटकत व्यवसायातील परंपरेचे प्रभाव आजही मोठा आहे. शहरीकरणाच्या प्रभावामुळे यांच्या परंपरागत रोजगार तसेच त्यांच्यातील विकासाच्या पद्धती बदल घडला आहे. शासकीय योजनांची आणि किमान सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतरही अनेक भागात शिक्षण कौशल्य विकास आणि रोजगारांच्या संधीनी वेग आला आहे. भारतात भटक्या विमुक्त जमातीसाठी विविध सरकारी योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. ज्यामध्ये आरोग्य, शिक्षण, निवास, आर्थिक सहाय्य दिले जाते. या योजनांच्या फायदा त्या जमातीपर्यंत पोहोचण्याच्या बाबतीत अनेक अडचणी आहेत त्यासाठी अधिक जागरूकता आणि सामाजिक सहकार्याची आवश्यकता आहे.

निष्कर्ष :–

गोसावी जमात ही ऐतिहासिक दृष्ट्या भटक्या स्वरूपाची असून त्यांचे जीवन स्थलांतरावर आधारित आहे. स्थलांतरामुळे त्यांना अनेक सामाजिक व आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. शिक्षणाचा अभाव, सामाजिक भेदभाव आणि आर्थिक अस्थिरता या समस्या त्यांच्या विकासात अडथळा निर्माण करतात. या समस्यांवर उपाय

शोधण्यासाठी गोसावी जमात विविध सामाजिक चळवळीत उद्यास आल्या आहेत. आधुनिक काळात गोसावी जम समाजात शिक्षण, संघटन आणि सामाजिक जागृतीमुळे सकारात्मक बदल दिसून येत आहे. शासन, सामाजिक संस्था आणि समाजातील सुशिक्षित व्यक्तींनी एकत्रित प्रयत्न केल्यास या समाजाचा सर्वांगीण विकास होऊ शकते .आधुनिक काळात सामाजिक चळवळी, शिक्षण आणि सरकारी योजनांमुळे या समाजात सकारात्मक बदल दिसून येत आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण रोजगार आणि सामाजिक समावेशन यावर विशेष भर देणे आवश्यक आहे.

संदर्भ :-

1. अर्जुन पांडुरंग जाधव (२०२५), मी मुक्त भटक्या जमातींच्या चळवळींच्या वैचारिक प्रेरणा, https://dx.doiorg/10.47772/IJRISS.2024.8120336
2. लक्ष्मण माने,(१९९७), विमुक्तयन, यशवंतराव चव्हाण फाउंडेशन, मुंबई
3. प्रा. बाळकृष्ण रेनके, (भटक्या विमुक्तांचा एल्गार येत आहे) पृष्ठ क्रमांक १६.
4. त्रि.ना.अत्रे (१९१५) गावगाडा, पृ. क्रमांक ६, वरदा पुणे.
5. नारायण भोसले (२०२१), महाराष्ट्रातील भटक्या विमुक्तांच्या बंधमुक्तीच्या चळवळी, पब्लिश अखंड (pp.96 ते 107) पब्लिक हाऊस, दिल्ली.
6. Ashwini Kumar,R. Bhagat (2022), migranis mobility and citizenship in India, published by605 third Avenue, network NY 1019.
7. डॉ. कदम नारायण धो (१९९५), महाराष्ट्रातील भटका समाज संस्कृती व साहित्य प्रतिमा, प्रकाशन पुणे.